# मेहता मराठी ग्रंथजगत

जुलै, २०२२
पृष्ठे ६८ किंमत : रु.१५
वर्ष बाविसावे
अंक सातवा

## महासम्राट

विश्वास पाटील



क्षणोक्षणी आणि पानोपानी अंगावर काटा उभा करणारी अपूर्व शिवगाथा!
दीर्घ अभ्यासाच्या आणि दक्षिणेतल्या दऱ्याडोंगरांच्या भटकंतीनंतर कादंबरीकार विश्वास पाटील यांनी आपल्या 'महासम्राट' या कादंबरीत डोळ्यांसमोर साक्षात उभी केली आहे.

खंड पहिला

## झंझावात

छत्रपती शिवरायांच्या जीवनावरील कादंबरीमाला

## छत्रपती शिवरायांच्या जीवनावरील
## महाकादंबरीकार विश्वास पाटील यांची कादंबरीमाला

मेहता पब्लिशिंग हाऊस प्रकाशित

# महासम्राट

विश्वास पाटील



खंड पहिला

## झंझावात



**प्रकाशन पूर्व नोंदणी**

मूळ किंमत
₹५७५

सवलतीत
₹४२५ फक्त
+
पोस्टेज ₹ ४०

पृष्ठसंख्या ४५०

प्रकाशन
१ ऑगस्ट, २०२२ रोजी
सवलत नोंदणी
१५ जुलै, २०२२ पर्यंत

मेहता पब्लिशिंग हाऊस

94205 94665
Pay +91 94223 23039

www.mehtapublishinghouse.com

# मेहता मराठी ग्रंथजगत

◆ जुलै २०२२ ◆ वर्ष बाविसावे ◆ अंक सातवा

**संपादक :**
अखिल मेहता

**संस्थापक संपादक :**
शंकर सारडा

**संपादन साहाय्य :**
पूजा भडांगे

**अंकाची किंमत १५ रु.**
वर्गणी मनीऑर्डरने अथवा ऑनलाईन पाठवावी.

**प्रसिद्धी :**
दरमहा ११ तारखेस

**मांडणी-अक्षरजुळणी**

*मेहता पब्लिशिंग हाऊस*

*— अनुक्रमणिका —*


| | |
|---|---|
| संपादकीय | ४ |
| एक एक पान घडताना... | १० |
| हस्तलिखित हस्तांतरण सोहळा | १६ |
| वाचकच बनतील शिवरायांच्या धगधगत्या इतिहासाचे साक्षीदार! | १८ |
| विश्वास पाटील आणि मेहता पब्लिशिंग हाऊस... | २० |
| अभिप्राय | २६ |
| दिनविशेष | ६१ |


संपादक-मुद्रक-प्रकाशक : अखिल मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन भवनसमोर, पुणे ४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२ । E-mail : mmgj@mehtapublishinghouse.com

‘मेहता मराठी ग्रंथजगत’ हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक अखिल सुनील मेहता यांनी जय गणेश ऑफसेट, २०/१डी/१अ, सोमवार पेठ, महाराजा लॉज मागे, पुणे- ४११०११ येथे छापून, १९४१ सदाशिव पेठ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक - अखिल सुनील मेहता.

'Mehta Marathi Granth Jagat' monthly is owned, Printed & Published by Akhil Sunil Mehta, Printed at Jai Ganesh Offset, 20/1D/1A, Somvar Peth, Behind Maharaja Lodge, Pune – 411 011 & Published at 1941, Sadashiv Peth, Pune – 411 030. Editor – Akhil Sunil Mehta.

## महासम्राट...

स्वातंत्र्योत्तर कालखंडातील दमदार लेखक म्हणून ज्यांचा लौकिक मराठी वाचकांमध्ये कायम आहे असे महाकादंबरीकार ज्येष्ठ लेखक म्हणजे विश्वास पाटील. गेली अनेक वर्षं इतिहास अभ्यासक आणि संशोधक म्हणून सर्वपरिचित असलेलं हे नाव मराठी कादंबरी क्षेत्रात 'बेस्टसेलर' म्हणून गणलं जातं. 'संभाजी', 'क्रांतिसूर्य', 'नॉट गॉन विथ द विंड', 'नागकेशर' यासारखी दर्जेदार पुस्तकं लिहून मराठी साहित्य संपदेत भर घालणारे विश्वास पाटील लवकरच आपल्या अभ्यासपूर्ण लेखणीतून छत्रपती शिवरायांच्या जीवनावरील कादंबरीमाला तमाम मराठी वाचकांच्या भेटीस घेऊन येत आहेत. मराठा साम्राज्याचा झंझावाती योद्धा, रयतेचा कैवारी, लढवय्या, समाजकल्याणकारी राजा शिवछत्रपती यांच्या जीवनातील महत्त्वाचा जीवनकाळ उलगडणाऱ्या 'महासम्राट' या ऐतिहासिक कादंबरी मालेतील पहिला खंड असलेली 'झंझावात' ही

कादंबरी येत्या ऑगस्टमध्ये प्रकाशित होत आहे, त्यानिमित्त हा विशेषांक...

विश्वास पाटील हे नाव काही मराठी साहित्य विश्वाला नवं नाही. आपल्या लेखणीतून ऐतिहासिक घटनांसोबतच सामान्य माणसांची व्यथासुद्धा तितक्याच ताकदीने मांडणारे, 'संभाजी' सारख्या प्रसिद्ध कादंबरीतून पुस्तक विक्रीचे नवे विक्रम घडवणारे लेखक म्हणून आपण त्यांना ओळखतोच. मेहता पब्लिशिंग हाऊसने आजवर विश्वास पाटलांची अनेक महत्त्वाची पुस्तके प्रकाशित केली आहेत. मानाच्या पुरस्कारांसोबतच वाचकांचा उदंड प्रतिसाद आणि प्रचंड खप त्यांच्या पुस्तकांना अजूनही मिळतोय. आजही विश्वास पाटील आपल्या लेखणीतून इतिहासातील कुठलं पान आपल्या दमदार शैलीत मांडणार याची वाचक मोठ्या आतुरतेने वाट पहात असतात. अशीच मोठी प्रतिक्षा आणि जवळपास ३० वर्षांच्या सखोल अभ्यासानंतर 'महासम्राट' ही कादंबरी आकाराला येत आहेत. ऐतिहासिक तथ्ये आणि कादंबरी लेखनातील नाट्यमयता यांच्याशी समझोता न करता उत्कृष्ट साहित्य निर्मिती करणारे विश्वास पाटील योग्य आणि वस्तुनिष्ठ इतिहास वाचकांसमोर आणण्यासाठी नेहमीच आग्रही असतात.

सनावळ्यांचा बेसुमार मारा करणारा, केवळ स्वप्नरंजन करणारा, सत्याला बाजूला सारून स्वतःच रचलेला इतिहास विश्वास पाटील यांच्या कोणत्याही कादंबरीतून वाचायला मिळत नाही. इतिहासाशी प्रामाणिक रहात त्यांतील नवे पैलू शोधणारा निर्भीड लेखक अशीच त्यांची प्रतिमा कायम आहे आणि तीच प्रचिती त्यांच्या आगामी कादंबरीतूनही येणार आहे.

ही कादंबरीमाला मोठ्या थाटात सर्व वाचाकांसमोर आणताना आम्हाला खूप आनंद होत आहे. रयतेच्या कल्याणकारी राजाची यशोगाथा नव्या शैलीत मांडणाऱ्या विश्वास पाटलांच्या या कादंबरीतील पहिल्या खंडाचा अर्थात 'झंझावात'चा हस्तलिखित हस्तांतरण सोहळा असो किंवा अखिल भारतीय साहित्य संमेलनातल्या पुस्तक दालनात कादंबरीचा पूर्व प्रकाशन नोंदणीचा सोहळा असो दोन्ही कार्यक्रमांना आलेला वाचकांचा भरघोस प्रतिसाद, त्यांचं प्रेम आणि लेखकांच्या नव्या साहित्यकृतीचं होणारं दिमाखदार स्वागत या सगळ्याच गोष्टी मराठी साहित्य प्रकाशन क्षेत्राला नवं वळण देणाऱ्या आहेत.

आम्हाला आशा आहे की, विश्वास पाटील यांच्या तळपत्या लेखणीतून उदयाला आलेला, इतिहासाच्या पानांवर सुवर्णाक्षरांनी लिहिला गेलेला हा 'झंझावात' सुजाण वाचकांच्या पसंतीस उतरून पुन्हा एकदा मराठी कादंबरी क्षेत्रात नवा इतिहास घडवेल.

# मेहता मराठी ग्रंथजगत

नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी
आजच वर्गणीदार व्हा.

## आमच्या छापील अंकाची वर्गणी

**त्रैवार्षिक वर्गणी ४५०रुपये**
**पंचवार्षिक वर्गणी ६००रुपये**

## डिजिटल अंकाची वर्गणी

**त्रैवार्षिक वर्गणी ३००रुपये**
**पंचवार्षिक वर्गणी ४००रुपये**

***Available on***
play.google.com / store / books
www.amazon.in

**Find us on:**
**facebook®**

https://www.facebook.com/mehta.publishinghouse

# मेहता पब्लिशिंग हाऊस

## टी बुक क्लब

BOOK CLUB

या क्लबचे सभासद व्हा. आणि उत्तमोत्तम अनुवादित पुस्तके निम्म्या किमतीत मिळवा!

आजच व्हा सदस्य, निम्म्या किंमतीत मिळवा पुस्तकं

* ₹ ५० भरून 'टी बुक क्लब'चे सदस्यत्व.
* दरवर्षी सहा लोकप्रिय पुस्तकांचे अनुवाद निम्म्या किंमतीत
* योजनेतील सहाही पुस्तके घेणे बंधनकारक

**टी बुक क्लब योजनेतील 'क्लासिक्स'साठी खास सवलत!**

₹ १०० भरून 'टी बुक क्लब' यादीतील कोणतीही ८ किंवा सर्व पुस्तके एकाचवेळी निम्म्या किंमतीत मिळवा. पोस्टेज खर्च अतिरिक्त.

फोन : (०२०) २४४७६९२४ ९४२०५९४६६५

सदस्यत्वासाठी ऑनलाइन लिंक - G Pay +91 94223 23039

www.mehtapublishinghouse.com/memberships.aspx


आमच्या पुस्तकांविषयी आणि नवीन योजनांविषयी जाणून घेण्यासाठी

## सर्व ग्रंथालयांना नम्र विनंती

कृपया आपला संपूर्ण पत्ता, (तालुका, जिल्हा, पिनकोडसहित), मेल-आयडी, फोन नंबर, मोबाइल नंबर ही माहिती आमच्या खालील व्हॉट्स ॲप नंबरवर कळवावी.

९४२०५९४६६५

**सर्व प्रकारची महाविद्यालयीन पुस्तके, यूपीएससी, एमपीएससी, सेट-नेट, इंजिनिअरिंग, मेडिकल, मॅनेजमेंट, सायन्स, कॉम्प्युटर इ. विविध विषयांवरील क्रमिक व संदर्भ पुस्तके यांचे माहेरघर**

# मेहता बुक सेलर्स

३२२, भाऊसिंगजी रोड, भवानी मंडपाजवळ,
कोल्हापूर ४१६ ०१२
वेळ : सकाळी ९.३० ते रात्री ८ **(शनिवारी बंद)**
फोन : (०२३१) २५४२९०१/२५४२३०४/२५४१८८१

Email : mehtabooksellers@gmail.com

**मेहता पब्लिशिंग हाऊस**

amazon

GET IT ON Google play

यांच्या संयुक्त विद्यमाने

नाहीत स्कॅन केलेली पाने किंवा नाहीत पीडीएफ्स...मराठीत प्रथमच, खरीखुरी eBooks युजर फ्रेंडली, वाचायला सोपी, सोयीस्कर- थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड, किंडल आणि अॅन्ड्रॉइड टॅब्लेटवर!

**इथे मिळतील ई-बुक्स...**

**eBooks**

**www.amazon.in**

**play.google.com**

**https://books.apple.com**



**Online पुस्तके खरेदी करा www.mehtapublishinghouse.com**

# एक एक पान घडताना...

***– अनिल मेहता***

(सल्लागार मंडळाचे संचालक)



पुस्तक वितरण आणि विपणनासाठी नव्या तंत्रज्ञानाचा उपयोग करणारी मेहता पब्लिशिंग हाऊस ही मराठीतील पहिली प्रकाशन संस्था आहे. ललित पुस्तकांसोबतच व्यवहारोपयोगी पुस्तकांची वाढलेली मागणी, नव्या तंत्रज्ञानानुसार केलेली पुस्तक निर्मिती सोबतच मुखपृष्ठनिर्मितीतील वाढलेली गुणवत्ता या सर्वच गोष्टींचा लेखाजोखा जाणून घेऊया या विशेष लेखात

## ११

आमच्या सर्व विक्रेत्यांकडं 'मेहता मराठी ग्रंथजगत' हे मासिक जातंच, पण त्यासोबत विक्रेत्यांना आम्ही नवनवीन पुस्तकांची मुखपृष्ठे, पोस्टर्सही पाठवतो. ती दुकानाच्या दर्शनी भागात 'डिस्प्ले' करा म्हणून विनंती करतो.

याशिवाय वाचकांपर्यंत पुस्तकं पोहचवायची असतील तर जाहिरात ही हवीच असं सुनीलला वाटतं. जाहिरातीसाठीचा खर्च मोठा असतो आणि सुनील तो करतो. मी एक दिवस लोकसत्तामध्ये व. पु. काळे यांच्या पुस्तकाची पानभरून जाहिरात बघितली. तेव्हा पहिल्यांदा मी खरंच हरपून गेलो. मला त्याची कल्पनाही नव्हती आणि खरोखरंच त्या जाहिरातीमुळं व. पुं.च्या पुस्तकांना

प्रचंड प्रतिसाद आला. आजही आमच्या प्रकाशनाच्या पेपरमध्ये आलेल्या हाफ पेज, फुल पेज अशा जाहिराती बघितल्या की मी सुखावून जातो. अलीकडे तर मेहता पब्लिशिंग हाउसच्या पुस्तकांच्या जाहिराती प्राईम टाईमला टीव्हीवरही येतात. हे सुनिलच करू शकतो.

मेहता प्रकाशनकडं सर्व ग्राहकांचा मोबाईल नंबर, ई-मेल यांची नोंद ठेवली जाते. त्या लोकांपर्यंत फेसबुक, व्हाट्सॲप, ई-मेल्स, एस.एम.एस, व्हिडीओजद्वारे सतत माहिती पोचवली जाते. नव्या सोशल मीडियाचा, तंत्रज्ञानाचा वाचकांपर्यंत पोहोचण्यासाठी सुनील पुरेपूर वापर करून घेतो. जसजसं नवीन तंत्रज्ञान येत गेलं तसतसं त्याप्रमाणं त्यानं स्वतःत बदल करून घेतला. मला हे सगळं जमलं असतं का, माहीत नाही.

नवनवीन तंत्रज्ञान येत गेलं तसं सुनीलनं आपलं संपूर्ण ऑफिस तंत्रज्ञानयुक्त करून घेतलं. मला वाटतं, मी मेहता पब्लिशिंग हाऊस ही संस्था उभी केली असेल, पण सुनीलनं या प्रकाशन संस्थेला अंतर्बाह्य संपूर्णतः नवं स्वरूप प्राप्त करून दिलं.

त्यामुळं पुस्तकं प्रसिद्ध करण्याचा झपाटा वाढला. महिन्याला वीस-पंचवीस नवी पुस्तकं तरी प्रसिद्ध होतात. ती विविध स्वरूपाची असतात. त्यात केवळ ललित साहित्याची पुस्तकं पूर्वीच्या तुलनेनं कमी असली तरी व्यवहारोपयोगी पुस्तकांची संख्या अधिक वाढलेली दिसते. नव्या तंत्रज्ञानानुसार पुस्तकांची निर्मिती, मुखपृष्ठ यातली गुणवत्ताही वाढली. बदलत्या सामाजिक, सांस्कृतिक परिस्थितीनुसार सुनील झपाट्यानं निर्णय घेतो आणि पुस्तकाचे स्वरूप, खरेदी विक्रीचे स्वरूप, जाहिरातीचे स्वरूप, वितरणाचे स्वरूप बदलून घेतो. त्यामुळं मेहतांचे प्रकाशन लक्षवेधी ठरलेले दिसते.

मी फेडरेशन ऑफ इंडियन पब्लिशर्सचा उपाध्यक्ष असताना आम्ही असं ठरवलं होतं की प्रत्येक भारतीय भाषेतील उत्कृष्ट प्रकाशकांचा दरवर्षी सत्कार करायचा. मराठी विभागाचं काम माझ्याकडं होतं. पहिल्या वर्षी आम्ही केशव भिकाजी ढवळे, दुसऱ्या वर्षी आम्ही मौज प्रकाशन, तिसऱ्या वर्षी पॉप्युलर, चौथ्या वर्षी कॉन्टिनेन्टल प्रकाशनाला आम्ही पुरस्कार दिला. पाचव्या वर्षी फेडरेशनच्या पदाधिकाऱ्यांनी व अध्यक्षांनी माझं काहीही न ऐकता मला हा पुरस्कार देण्याचं ठरवलं व त्याप्रमाणं त्यांनी १९९६ साली 'फेडरेशन ऑफ इंडियन पब्लिशर्स तर्फे' उत्कृष्ट प्रकाशकासाठी देण्यात येणारा पुरस्कार मला

दिला.

तसेच २०१६ साली गेल्या पन्नास वर्षांतील प्रकाशन क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल 'द फेडरेशन ऑफ पब्लिशर ऑफ इंडिया' अँड 'बुकसेलर्स असोसिएशन ऑफ इंडिया' या संस्थेच्या वतीनं विशेष पुरस्कार देण्यात आला.

त्याचबरोबर १९९७ साली मराठी प्रकाशन क्षेत्रात अत्यंत मानाचा समजला जाणारा 'वि. पु. भागवत ' पुरस्कार संस्थेस मिळाला. त्याबरोबर या प्रकाशनाच्या अनेक पुस्तकांना राज्यसरकारचे साहित्य अकादमीचे व अन्य संस्थांचे विविध प्रकारचे पुरस्कार लाभले आहेत. आतापर्यंत आम्ही पाच - एक हजार नवनवी पुस्तकं प्रसिद्ध केलेली आहेत. त्यांची संख्या वाढतेच आहे.

आज सुनीलच्या हाताखाली एच. आर. मॅनेजर, डिझायनर, संपादक, प्रूफरीडर्स, मुखपृष्ठकार, निर्मिती व्यवस्थापक आदी असे तीस ते चाळीस लोक काम करतात. परदेशी हक्क मिळवण्यासाठीचा विभाग, अर्थ विभाग, विक्री विभाग, जाहिरात विभाग, संपादन विभाग, मुद्रितशोधन विभाग, निर्मिती विभाग. त्यातही दोन भाग आहेत, एक नव्या पुस्तकांच्या निर्मितीचा, तर दुसरा जुन्या पुस्तकांच्या नव्या आवृत्तीच्या निर्मितीचा. असे त्यानं वेगवेगळे विभाग केले आहेत व ते विभाग बघणारे स्वतंत्र व्यक्ती आहेत. आणि मी अभिमानानं ही गोष्ट सांगू शकतो, की फक्त आमची प्रकाशन संस्था अशी आहे, की ज्यामध्ये असे सगळे विभाग आहेत. प्रत्येकानं फक्त आपापल्या विभागाचंच काम पहायचं हे ठरलेलं आहे.

कसदार पुस्तकांची संख्या वाढण्याचं एक महत्त्वाचं कारण म्हणजे सुनीलचा संपादकीय विभाग आहे. या विभागात साहित्यविषयक आणि लेखनविषयक जाणकारी असलेली माणसं काम करत असतात. हे लोक आलेली हस्तलिखितं योग्यतेच्या, कसाच्या, आशयाच्या, उपयुक्ततेच्या दृष्टीनं तपासतात. त्यांचं पहिलं वाचन करून सुनील मेहतांशी चर्चा करतात. त्यांची योग्यायोग्यता आणि उपयुक्तता याविषयी निर्णय घेतात आणि मगच ते हस्तलिखित प्रकाशित करायचे की नाही, हे ठरवतात. तो निर्णय घेऊनच हस्तलिखितावर त्याच्या लेखकाच्या अनुमतीनं योग्य ते संस्कार करतात. कधी पुनर्लेखन करण्यास लेखकास सांगतात आणि मगच प्रकाशनाची पुढील प्रक्रिया सुरू करतात.

पूर्वी पत्रव्यवहारामुळं प्रकाशनकाळ लांबला जायचा. अनुवादित पुस्तकांचे

हक्क लवकर प्राप्त व्हायचे नाहीत. आज इंटरनेट, ई-मेलमुळं अनुवादित पुस्तकांचे हक्क मिळायला वेळ लागत नाही. पूर्वी जे कव्हर्स पाठवा, पुठ्ठे पाठवा, लॅमिनेशन पाठवा असं जे वेगवेगळ्या ठिकाणांहून मागवलं जायचं तेही आता बंद झालंय. मुंबई ते मनीपॉलपर्यंत. त्यांनी पुस्तकाचं कोटेशन द्यायचं की आम्ही, सांगू तो कागद, बायडिंग आमचं, अन् मग त्यांचं आमचं जमलं की ते पुस्तक बायडिंग होऊनच आमच्याकडं येतं. पुण्यातील प्रिंटर असं म्हणतात, की 'आम्हाला असं काही जमणार नाही.' पण सुनील त्यांना प्रोत्साहन देत म्हणतो, 'जमेल. करून पहा. मला जमतंय.' आता अलीकडे काही लोकांनी आमचं बघून असं करायला सुरूवात तरी केली आहे.

प्रकाशन क्षेत्रात नवनवीन गोष्टी आणण्यात सुनील इतर प्रकाशकांपेक्षा अनेक पावलांनी पुढं असतो. आमची १२०० ई-बुक्स आहेत. आज आमच्याकडं प्रिंटेड छापील पुस्तकांबरोबरच ई बुक्सचंही व्हर्जन तयार असतं.

आमच्या फेसबुकवर, ब्लॉगवर तसेच वेबसाईटवरही तुम्हाला बऱ्याच गोष्टी नव्यानं दिसतील.

आज रणजित देसाई, वि. स. खांडेकर, आनंद यादव, व. पु. काळे, शंकर पाटील आहेत. द. मा. मिरासदार, व्यंकटेश माडगूळकर तसेच अनुवादित पैकी किरण बेदी, अरूण शौरी, सुधा मूर्ती अशा अनेक मोठमोठ्या लेखकांची सर्वच्या सर्व पुस्तके आम्ही प्रकाशित केली आहेत. असे भाग्य फारच कमी प्रकाशकांना मिळतं. विक्रेत्याला एका लेखकाची एकाच प्रकाशकाकडं जर पुस्तकं मिळाली तर त्याचा फायदा पुस्तक वाचकांइतकाच विक्रेत्यांनाही मोठा होतो. त्यांना इतर ठिकाणी जाऊन पुस्तकं गोळा करण्याचे कष्ट वाचतात व आर्थिक कमाईही अधिक होते.

सुनीलला दोन मुलं आहेत. अखिल व साहिल. आता अखिल आमच्यासोबत आला आहे. ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटीमधून त्यानं प्रकाशन व्यवसायातलं शिक्षण घेतलं आहे. तिथं त्याला जे शिकायला व अनुभवायला मिळालं. त्यातून मेहता पब्लिशिंग हाऊसला पुढच्या चाळीस वर्षात एक ग्लोबल कंपनी बनवून दाखवण्याचं स्वप्न तो पाहतोय, याचा मला अतिशय आनंद आहे. सध्या तो ई-बुक्सचं काम पाहतो. साहिल फोटोग्राफी जर्नालिझम करतोय. तो सुद्धा मदत करत असतो.

मराठीत 'ई-बुक्स' प्रथम आम्ही आणली. आज आमच्याकडं बाराशेच्यावर

ई-बुक्स आहेत. आता तर प्रत्येक नवीन येणाऱ्या पुस्तकाचं ई-बुक ही आमचं तयार असतं.

आज मागं वळून पहातो तेव्हा आजपर्यंत घेतलेल्या कष्टांबद्दल, निर्णयांबद्दल खूप समाधान वाटतं. मला व्यवसाय करायचा होताच पण केवळ पैसा हे उद्दीष्ट कधीच नव्हतं. त्याहीपलीकडं जाऊन आत्म्याच्या पातळीवर मला जो आनंद मिळवायचा होता तो मी निश्चितपणे मिळवला असं मी म्हणेन. मी माझ्या आयुष्याबद्दल आज खरोखरच कृतार्थ आहे.

(क्रमशः)

(श्री. अनिल मेहता यांच्या पूर्वलिखित आत्मचरित्रातून)


**नवी संहिता... नवा आशय...**

तथागत
गोतम बुद्ध

**वसंत गायकवाड**

राजपुत्र सिद्धार्थ ते तथागत गोतम बुद्ध या दीर्घ मनोप्रवासाचं प्रत्ययकारी चित्रण




**किंमत : १४००/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

## नवी संहिता... नवा आशय...

# निर्भय प्रशासन

**किरण बेदी**

अनुवाद

**सुप्रिया वकील**

किरण बेदींच्या निर्भय प्रशासनातून
साकारलेलं समृद्ध पुदुच्चेरीचं स्वप्न




**किंमत : ४४०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

# राष्ट्रीय शिक्षण धोरण,2020 - चिकित्सा

**प्रा. डॉ. भालबा विभुते**




भारतिय शिक्षण व्यवस्थेत अमूलाग्र बदल करू इच्छिणाऱ्या धोरणांवर
अभ्यासपूर्वक भाष्य करणारी पुस्तिका

**किंमत : २३०/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

# हस्तलिखित हस्तांतरण सोहळा

मायमराठीच्या समृद्ध साहित्यदरबारात बांधली महासम्राट कादंबरीमालेची मुहूर्तमेढ

महाकादंबरीकार विश्वास पाटील यांच्या लेखणीतून उतरलेली कादंबरीमाला 'महासम्राट' या मालेतील पहिला खंड 'झंझावात'च्या हस्तलिखिताचा हस्तांतरण सोहळा दि. १२ एप्रिल २०२२ रोजी उत्साहात पार पडला.




मराठी मनावर अधिराज्य गाजवणारं आभाळासम व्यक्तिमत्त्व छत्रपती शिवाजी महाराज आणि समृद्ध शब्दसंपदेचे वारस विश्वास पाटील... असा अनोखा मेळ साधणारी नवी दमदार कादंबरीमाला 'महासम्राट' लवकरच वाचकांच्या भेटीस येत आहे.

या कादंबरीमालिकेचा पहिला खंड 'झंझावात'च्या हस्तलिखिताचा हस्तांतरण




सोहळा माजी संमेलनाध्यक्ष श्रीपाल सबनीस, लेखक विश्वास पाटील, मसाप पुणेचे कार्याध्यक्ष मिलिंद जोशी, दैनिक सकाळचे संपादक सम्राट फडणीस यांच्या उपस्थितीत मेहता पब्लिशिंग हाऊसच्या कार्यालयात पार पडला.

धाडसी योद्धे आणि युगपुरुष इतिहास निर्माण करतात, तर कवी, नाटककार आणि साहित्यिक त्यांच्या मुलखावेगळ्या जीवनगाथेला आपल्या शब्दशिल्पाद्वारे आकार देतात. छत्रपती शिवरायांनी महाराष्ट्रात आकाराने छोटंसं हिंदवी स्वराज्य निर्माण केलं. परंतु त्यांच्या काळापासूनच त्यांनी आपल्या महान कर्तृत्वाने जगभरातील स्वातंत्र्यप्रेमी जनतेच्या हृदयावर एखाद्या महासम्राटासारखं राज्य केलं आहे. याच विषयावर कादंबरीकार विश्वास पाटील यांनी 'महासम्राट' ही कादंबरीमाला लिहिली आहे.

ही कादंबरी मराठीसोबतच हिंदीमध्येही प्रकाशित होत असून भारतातील दिल्लीची ज्येष्ठ प्रकाशन संस्था राजकमल ही कादंबरी प्रकाशित करत आहे.

◆

## वाचकच बनतील शिवरायांच्या धगधगत्या इतिहासाचे साक्षीदार!

'हो, मला खात्रीच आहे, मी जी आता मायमराठीमध्ये 'महासम्राट' नावाची कादंबरी घेऊन वाचकांच्या समोर येत आहे. महाराष्ट्राच्या दऱ्याखोऱ्यांनी आणि इथल्या वादळवाऱ्याने जी शिवगाथा मला सांगितली आहे. त्यामध्ये अफजलखान आणि शिवरायांच्यामधील संघर्षाचा प्रसंगही मी लिहिला आहे. जो या आधी अनेकांनी अनेकदा सांगितला आहे. मात्र हे सांगताना मी संशोधनाच्या अंगाने प्रतापगडाच्या परिसराकडे सरकणाऱ्या अनेक अपूर्व व अकल्पित वाटा व वळणे दर्शविण्याचा प्रयत्न केला आहे. माझ्या 'झंझावात' या खंडातील अनेक प्रसंगांपैकी हा एक आहे.

या आधी अफजलखानाने सलग पन्नास लढाया जिंकल्या होत्या. पराभव किंवा हार हा शब्दच कधी त्याच्या आसपासही फिरकला नव्हता. त्यामुळेच विजापुराहून निघताना शिवरायांचा पराभव करून त्यांना आपण साखळदंडाने बांधून जिवंतच घेऊन येऊ असा वेडा विडा त्याने उचलला होता.

तेव्हा अफजलखानाच्या मालकीचा अनेक गलबतांचा तांडा गोव्याकडच्या समुद्रामध्ये होता. प्रतापगडाच्या लढाई वेळी अफजलखानाने मोठ्या हुशारीने गुपचूप गोव्यामार्गे कोकणात दाभोळच्या बंदरात तीन जहाजे आणून नांगरून ठेवली होती. त्याच्या स्वप्नाप्रमाणे तो जर शिवरायांना जिवंत पकडण्यात यशस्वी झाला तर, विजापूरकरकडे जाताना वाटेत मराठे शिवरायांना सोडवण्यासाठी हजारोंच्या जमावाने गोळा होऊन आपणास कापून काढतील अशी भीती त्याला वाटत होती. त्यामुळेच महाराजांना पकडल्यावर कोकणाचे घाट उतरून रातोरात दाभोळ बंदरातून त्यांना समुद्रमार्गे गोव्याकडून विजापूरला पळवायचे खतरनाक ख्वाब त्याने बघितले होते.

इकडे शिवरायांच्या महासंघर्षासाठी सह्याद्रीच्या रानातील फक्त मावळे नव्हेत तर हजारो घोडी, खेचरे, तोफांचे बैल सारे चराचर कसे उतरले होते. त्यामुळेच महाराजांनी अफजलखानाच्या बेछूट स्वप्नांचा चुराडा करून प्रतापगडाच्या पायथ्यालाच त्याच्यासाठी कबर खोदायला कसे भाग पाडले.

शिवरायांनी आपल्या प्रचंड श्रमाने प्रतापगडाच्या परिसरातील धनगर, गुरे-वासरे, गावोगावचे पाटील, कुणबी आणि माता-भगिनींना आपल्या लढाईमध्ये कसे उतरवले. विजापुरी फौजेच्या मानाने आपले बळ कमी असतानाही शेवटी इतिहासाचे चक्र उलटेसुलटे कसे फिरवले. कळीकाळालासुद्धा प्रतापगडाच्या परिसरात मराठ्यांच्याच बाजूने तुतारी फुंकायला कसे भाग पाडले.



केवळ वाचकांच्या व श्रेष्ठ गुरुजनांच्या आशीर्वादावर पानोपानी व अंगावर क्षणोक्षणी काटा उभा करणारी ती सारी चित्तथरारक कहाणी पेश करण्यात मी यशस्वी झालो आहे असे मला वाटते. मी आपल्या दीर्घ अभ्यासाच्या व गेली अनेक वर्षं दक्षिणेतल्या गडकिल्ल्यांच्या भटकंतीनंतर व मूळ कागदपत्रांचा शोध घेऊन नव्याने शिवरायांची ज्वलजहाल कहाणी माझ्या 'महासम्राट' या नव्या कादंबरीत उभी केली आहे.

या कादंबरीची मेहता प्रकाशनाने वाचकांच्या सोयीसाठी १५ जुलैपर्यंत सवलत योजना जाहीर केली आहे. तिचा लाभ वाचक बांधवांनी जरूर घ्यावा

महासम्राट ही कादंबरी वाचताना शिवरायांसोबत वाचकांनासुद्धा त्या युद्धात व युगात प्रत्यक्ष सहभागी झाल्याचा थरारक अनुभव आल्याशिवाय राहणार नाही याची मला खात्री आहे.

— विश्वास पाटील

◆

## विश्वास पाटील आणि मेहता पब्लिशिंग हाऊस...

सप्टेंबर १९९६ मध्ये शंकर सारडा यांच्या एकसष्टीनिमित्त साताऱ्यात समारंभ ठेवला होता. तेव्हा सारडा कुटुंबीयांनी बऱ्याच लेखक, प्रकाशक, संपादक, पत्रकार मंडळींना बोलावलं होतं. मलाही बोलावलं होतं. त्यावेळचा किस्सा मला आजही आठवतो. दुपारी शंकर सारडांचा सत्कार समारंभाचा कार्यक्रम झाला आणि रात्री त्यांनी काही खास लोकांची जेवणाची व्यवस्था एका हॉटेलच्या टेरेसवर केली होती. तिथं माधव गडकरी, सदा डुंबरे, वसंत कानेटकर, विश्वास पाटील अशी बरीच मंडळी हजर होती. तर आम्ही रात्री गप्पा मारत बसलो होतो.

तेव्हा सदा डुंबरेंनी मला एक खोचक प्रश्न विचारला, ''विश्वास पाटलांची सुभाषबाबूंवरची कादंबरी तयार आहे, तुम्ही घ्याल का?''

त्यावर मी म्हटलं, ''माझी तयारी आहे आणि त्याचे ॲडव्हान्स मानधन म्हणून मी दहा लाख रुपये द्यायला तयार आहे.''

त्यावर सगळेच आश्चर्यचकित झाले. माधव गडकरी अविश्वासानं म्हणाले, ''मी गोव्यात सकाळचा संपादक होतो. बऱ्याचदा रात्री मद्यपान करत बसायचो आणि बऱ्याच खाणी विकत घ्यायचो. तसं बोलताहात तुम्ही. असं हे प्रत्यक्षपणे होत नाही.''

त्यावर मी माधव गडकरींना त्वेषानं म्हणालो, ''हे प्रत्यक्षात आणूयात. विश्वास पाटलांनी आत्ता 'हो' म्हणावं आणि मला चार-पाच तासांचा वेळ द्यावा. मी कोल्हापूरला जातो, पैसे आणतो. तोपर्यंत तुम्ही इथंच बसा.''

ही जी ऑफर होती ती त्या वेळच्या वृत्तपत्रांमध्ये छापून आली होती. ती राष्ट्रीय बातमी झाली होती. एखाद्या कादंबरीकाराला दहा लाख रुपये देणारा मराठी प्रकाशक म्हणून ही बातमी दिल्लीपर्यंत जाऊन पोचली. मला दिल्लीहून फोन आले, ''हा कोण वेडा प्रकाशक आहे?'' मी सांगितलं, ''मीच तो.'' ते खरोखरंच आश्चर्यचकित झाले. आमचा तो व्यवहार झाला नाही कारण विश्वास

पाटलांनी ती कादंबरी अगोदरच राजहंस प्रकाशनला दिली होती.

तर मी विश्वास पाटील या मराठी लेखकासाठी एवढ्या मोठ्या मानधनाची रक्कम क्षणार्धात कसा बोलून गेलो? त्याचं कारण म्हणजे या लेखकाच्या लेखणीची ताकद मला तोपर्यंत लक्षात आली होती. खरं म्हणजे अगदी कॉलेज वयात असताना त्यांनी त्यांची एक कादंबरी माझ्याकडं आणून दिली होती. मी ती आनंद यादवांना वाचायला दिली होती. यादवांनी ती वाचून त्यात बऱ्याच सूचना लिहिल्या होत्या, पण ती कादंबरी आजतागायत प्रकाशित झाली नाही.

त्यानंतर माझा व विश्वास पाटलांचा संपर्क नव्हता. ते कोल्हापूरला शिकायला होते एवढंच मला माहीत होतं. पण नंतर त्यांनी 'पानिपत' लिहिलं आणि त्यांचं नाव मोठं होत गेलं. वयाच्या २८व्या वर्षी ही ऐतिहासिक कादंबरी लिहून त्यांनी खरोखर इतिहास घडवला होता. अन् अशा तरुण, प्रतिभावंत लेखकासाठी माझी तेवढी तयारी होती. अर्थात ज्यावेळी त्या पार्टीत मी तो प्रस्ताव त्यांना दिला, तेव्हा त्यांनाही वाटलं नव्हतं की, मी इतका मोठा आर्थिक प्रस्ताव त्यांच्यापुढं मांडेन!

त्यानंतर काही वर्षांनंतर मला त्यांच्या नव्या लेखनाविषयी समजलं. मी त्यांना फोन केला, ''तुम्ही 'संभाजी' नावाची कादंबरी लिहीत आहात, असं मी ऐकतोय.''

त्यांनी सांगितलं, ''होय. ती तुम्ही प्रकाशित कराल का?''

मी लगेचच 'हो' म्हणालो. त्यानंतर ते आमच्या पुण्याच्या ऑफिसमध्ये आले. त्यांचं आम्ही यथोचित स्वागत केलं. पण त्यांनी सोबत 'संभाजी'चं हस्तलिखित आणलं नव्हतं. ते म्हणाले, ''या कादंबरीचं हस्तलिखित घ्यायला तुम्हाला रायगडावर यावं लागेल.''

मला त्यांची ही कल्पना अतिशय आवडली. आम्ही तिथं गेलो. त्यांनी संभाजीचं हस्तलिखित तिथं दिलं. हस्तलिखित देताना ते म्हणाले, ''तुम्हाला हवं असेल तर तुमच्या संपादकाकडून संपादित करून घ्या. माझं काही म्हणणं नाही.''

पण 'संभाजी' कादंबरी त्यांनी अतिशय व्यवस्थितपणे लिहिली होती.

विश्वास पाटलांच्या बाबतीत माझ्या एक लक्षात आलं, की कुठल्याही विषयाचा ते सांगोपांग अभ्यास करून लिहिणारे लेखक आहेत. 'संभाजी'

लिहिताना त्यांनी दुर्मीळ अशी कागदपत्रं मिळवून वास्तव माहिती समोर आणली. संभाजींचं जिथं जिथं वास्तव्य होतं, जिथं जिथं ते तळ ठोकून होते, जिथं त्यांची हत्या केली गेली त्या ठिकाणी ते गेले होते. स्वप्नरंजन करणारा, सत्याला बाजूला ठेवून स्वतःच रचलेला इतिहास ते सांगत नाहीत. इतिहासाशी पूर्ण प्रामाणिक राहून ते आपलं संशोधन संवेदनशीलपणे मांडतात. काहीतरी थोडं फार वाचून त्यावरून काल्पनिक लिहिणारेही लेखक असतात, पण असं लेखन मनाला भिडत नाही, कारण त्यातल्या खऱ्या इतिहासाची माहितीच मिळत नाही. विश्वास पाटील अशा प्रकारचे लेखक नाहीत. त्यांचं लेखन दर्जेदार आहे. तरीसुद्धा थोडंफार संपादित करावं लागलं व त्यांनी त्याला मान्यता दिली.

मुंबईत शिवाजी मंदिरात 'संभाजी' कादंबरीचा प्रकाशन समारंभ झाला. त्या प्रकाशन समारंभाच्या वेळी सुनील गेला होता. तिथं बरेच लेखक व प्रकाशक हजर होते. समारंभात प्रकाशक म्हणून बोलताना सुनील म्हणाला, ''मी आज विश्वास पाटलांना या पुस्तकासाठी अँडव्हान्स रॉयल्टी देत आहे.''

आणि आपल्या हातातलं चेकचं पाकिट त्यानं विश्वास पाटलांना दिलं. विश्वास पाटलांनी ते पाकीट हातात घेऊन तसंच टेबलवर ठेवलं, पण समोरील प्रेक्षकांमधून कोणीतरी ओरडलं, ''नुसतंच पाकीट आहे का चेक आहे? आणि चेक असेल तर तो किती रकमेचा आहे हे आम्हाला समजावं.''

आणि विश्वास पाटलांनी नाईलाजानं ते पाकीट उघडून त्यातील चेक बाहेर काढला. बघितला, तर तो तीन लाख रुपयांचा चेक होता. तर तेव्हाही बऱ्याच प्रकाशकांना तो एक धक्का होता. सुरूवातीलाच तीन लाख रुपयांची रॉयल्टी देणं हे काम सोपं नव्हतं. त्यामुळं मेहता पब्लिशिंग हाऊसचं नाव झालं आणि विश्वास पाटील आमचे चांगले लेखक मित्र झाले. आजपर्यंत त्यांना कित्येक लाखांची रॉयल्टी मेहता पब्लिशिंगकडून मिळाल्याचं ते स्वतःच म्हणतात. त्यानंतर विश्वास पाटील जे जे लिहितील ते ते आमच्याकडं येत आहे.

'लोकप्रभा' साप्ताहिकामध्ये ते चित्रपटांच्या रसग्रहणावर आधारित लेख लिहीत होते. ते लेख गाजत होते. त्या लेखांचं 'नॉट गॉन विथ द विंड' हे पुस्तक आम्ही केलं. या लेखसंग्रहातून त्यांनी परदेशी साहित्य आणि चित्रपटांची सफर मराठी प्रेक्षकांना घडविली. त्याच्या आतापर्यंत चार-पाच आवृत्या निघाल्या आहेत. 'क्रांतिसूर्य' हे नाना पाटलांवर त्यांनी खूप आधी एक पुस्तक

लिहून ठेवलं होतं. तेही आमच्याकडं आलं.

त्यांच्या काही ललित लेखांचं मिळून ‘बंदा रुपया’ नावाचं पुस्तक आम्ही काढलं. तेही चांगलं गेलं. त्या पुस्तकाची आठवण अशी आहे, की  हे पुस्तक तयार झाल्यावर मी ते ज्यावेळी बघितलं त्या वेळी आम्हा सर्वांनाच ते अजिबात आवडलं नव्हतं. एका दर्जेदार लेखकाचं पुस्तक सुमार काढल्याची मला जाणीव झाली. विश्वास पाटलांचा मला फोन आला, ‘‘आपण यात काही बदल करू शकतो का?’’

‘‘हो. आपण नक्कीच यात काहीतरी बदल करू.’’ मी म्हणालो.

आणि या पुस्तकाची हजार प्रतींची पहिली आवृत्ती जी आम्ही प्रकाशित केली होती, त्याचे आम्ही दोन तुकडे केले. ती पूर्णपणे रद्दीत टाकली. त्या पुस्तकाची पुन्हा नव्यानं मांडणी केली. त्यातले फोटोग्राफ व्यवस्थितपणे लावले. हे सगळं सुनीलनं व्यवस्थित करून घेतलं. मग पुस्तक  प्रकाशित केलं.

आजकाल सातत्यानं लिहिणारे फार कमी लेखक आहेत, पण विश्वास पाटील हे लिहिते लेखक आहेत. त्यांच्या पुस्तकांचे इंग्रजी प्रकाशनाचे हक्क आम्ही घेतले आहेत. नुकतेच ‘पानिपत’ हे पुस्तक इंग्रजीत आलं आहे.

विश्वास पाटील या लेखकाला मराठीतला ‘बेस्टसेलर लेखक’ म्हटलं जातं किंवा सर्वाधिक मानधन घेणारा लेखकही. तर हे कशामुळं? मला वाटतं, कुठल्याही प्रकारचं लेखन असू दे, केवळ प्रतिभा आहे म्हणून लेखक स्वत:ची ओळख निर्माण करू शकत नाही. त्याच्या जोडीला अशा प्रकारे



अभ्यास करून लिहिणारे लेखक असतील तरच ते यशस्वी होतात. बाकी वरवर लिहिणारे लेखक वरवरच राहतात. वाचकांकडून त्यांना प्रतिसाद मिळत नाही.

– अनिल मेहता

(श्री. अनिल मेहता यांच्या पूर्वलिखित आत्मचरित्रातून)

◆


वाचकच बनतील शिवरायांच्या धगधगत्या इतिहासाचे साक्षीदार !

महा सम्राट

विश्वास पाटील

तेव्हा अफझलखानाच्या जहाजांचा तांडा गोवा व डिचोली भागात होता. त्याने प्रतापगडच्या लढाईवेळी दाभोळच्या बंदरात गुपचूप तीन जहाजे आणून नांगरून ठेवली होती. आपण शिवरायांना जिवंत पकडण्यात यशस्वी झालो तर विजापूरच्या वाटेवर हजारोंच्या जमावाने प्रक्षुब्ध झालेले मराठे आडवे येऊन आपणास ससैन्य कापून काढतील अशी त्याला भीती वाटत होती. त्यामुळे फ़तेहनंतर राजांना रातोरात कोकणाचे घाट उतरून दाभोळ, गोवामार्गे विजापूराकडे जिवंत पळवायचे खतरनाक ख्वाब तो बघत होता.

इकडे शिवरायांनी आपले बळ कमी असतानाही अफझलखानाच्या बेछूट स्वप्नांचा चुराडा केला. सह्याद्रीच्या मदतीने कळीकाळालासुद्धा मराठ्यांच्या बाजूने तुतारी फुंकायला कसे भाग पाडले.

क्षणोक्षणी आणि पानोपानी अंगावर काटा उभा करणारी ही अपूर्व शिवगाथा! दीर्घ अभ्यासाच्या आणि दक्षिणेतल्या दऱ्याडोंगरांच्या भटकंतीनंतर कादंबरीकार विश्वास पाटील यांनी आपल्या 'महासम्राट' या कादंबरीत डोळ्यांसमोर साक्षात उभी केली आहे.



पृष्ठसंख्या : ४५०
मूळ किंमत : ₹५७५
सवलतीत : ₹४२५ फक्त + पोस्टेज ₹४०

प्रकाशन : १ ऑगस्ट २०२२ रोजी
सवलत नोंदणी :
१५ जुलै २०२२ पर्यंत

महाराष्ट्रातील सर्व प्रमुख पुस्तक विक्रेत्यांकडे नोंदणी सुरू !

मेहता पब्लिशिंग हाऊस

☎ ०२०-२४४७६९२४ ९४२२३२३०३९
sales@mehtapublishinghouse.com
www.mehtapublishinghouse.com

available on : amazon

## नवी संहिता... नवा आशय...

# प्रश्नप्रदेशापलीकडे...

**दिनकर जोषी**

अनुवाद

**अनघा प्रभुदेसाई**




बुद्धाचं जीवन आणि त्याच्या तत्त्वज्ञानाची उपयुक्तता अभ्यासपूर्णतेने अधोरेखित करणारी कादंबरी

**किंमत : ३४०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

# पानिपतचे रणांगण

**विश्वास पाटील**




अंतर्गत कलह, दगलबाजी आणि धर्मांधतेचं जहर...
पानिपतच्या तिसऱ्या लढाईने केला संहाराचा कहर...

**किंमत : १८०/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

अभिप्राय

## संभाजी : सह्याद्रीच्या ढाण्या वाघाला छाव्यानं घातलेली साद!...

क्रांतिसूर्य, पांगिरा, पानिपत, झाडाझडती व महानायकानंतर 'संभाजी' ही विश्वास पाटील यांची आणखी एक यशस्वी कादंबरी. गलेलठ्ठ कादंबऱ्या लिहिण्यामध्ये पाटलांचा हातखंडा. एकवेळ तब्येतीचं 'बेरिंग' सुटेल पण कादंबरीचं सुटणार नाही, अशी त्यांची ख्याती. त्याचीच प्रचीती संभाजीच्या पानापावर येते. जणू काही सह्याद्रीच्या नीबिड अरण्यात, दऱ्याखोऱ्यात वावरलेल्या ढाण्या वाघाला दुसऱ्या छाव्यानं घातलेली ही सादच म्हणायची!

'संभाजी' या विषयावर अनेक नाटककार, शाहीर, बखरकार तसेच ललित लेखकांनी पोटं भरली. मात्र हे कर्तव्य पार पाडताना संभाजी राजे व कवी कलश यांना मात्र नाच-गाणी करणाऱ्यांच्या माडीवर पोहोचवले! लेखक नायक झाले, पण खलनायकाचा शिक्का मात्र संभाजी महाराजांच्या माथी बसला! कुणी इतिहासाचा धांडोळा घेतला नाही. खऱ्या-खोट्याचा शहानिशा केला नाही. मात्र, मी सांगतो, लिहितो तेच खरं, असा अभिनिवेश मात्र बाळगला व मराठी मनाला याच नशेत ठेवण्याचा प्रयत्न केला. विश्वास पाटील यांनी मात्र इतिहासाच्या बुलंद दरवाजाला धडक मारली व खऱ्या इतिहासाची लूट करून 'संभाजी'च्या रुपाने ती मराठी माणसाच्या ओंजळीत ओतल्याचे ही महाकाय कादंबरी वाचताना

पदोपदी जाणवते. माडीवरच्या मवाल्यांचं मोजमाप काढताना विश्वास पाटलांनीही अनेक माड्या धुंडाळल्या, पण त्या कुबेराच्या धनालाही लाजवील अशा ऐतिहासिक दस्ताऐवजाच्या होत्या! या पायऱ्यांचं मोजमाप काढून पाटलांनी आपल्या ठसकेबाज कोल्हापुरी भाषेत ठणकावून सांगितलं की, 'दळभद्र्यांनो, तुमच्या चित्तातला-मनातला व प्रत्यक्षातला संभाजी वेगळा आहे. नायकिणीच्या माडीच्या पायऱ्या उतरताना ज्यांना स्वत:च्या धोतराच्या निऱ्यांचं भान रहात नाही, त्यांना तो काळाकभिन्न सह्याद्री




व तो तेज:पुंज संभाजी तरी काय कळणार!' पाटलांचं हे मत 'संभाजी' कादंबरीच्या शब्दाशब्दातून व्यक्त होत राहतं, हे मात्र खरं!

संभाजी राजांना विसाव्या शतकातच बदनामीच्या चिखलात रुतावं लागलं नाही तर हा चिखल त्यांच्या पोरसवदा वयापासूनच त्यांच्या भाळी लागला होता. पोटाची काळजी दूर करण्यासाठी लेखण्या चालवून आज संभाजीस बदनाम करण्यात आलं! तर त्याकाळी मराठी सल्तनीचा फड सांभाळणारेही पोटार्थी 'लेखनिक'च होते! पोट दोघांनाही असलं तरी फरक इतकाच होता की, पुराणातील चुकीच्या घटनांचा दाखला देऊन, शब्दांचा खेळ करून आज पोट भरलं जातं. तर तेव्हा आपल्या फडकरी काव्यात अडचण नसावी म्हणून जित्या-जागत्या माणसांचा काटा काढण्यासाठी लेखण्या खरडल्या जायच्या. त्याचे घाव इतके जालिम होते की, पाटलांच्या या कादंबरीतील पहिल्याच प्रकरणात संभाजी राजे छत्रपती शिवरायांना म्हणतात, 'आबासाहेब, आजकाल आमचे दिवस इतके फिरले आहेत की, महाराजांनी आपल्या हृदयाची कवाडं शंभूसाठी बंद करून टाकलीत. अन् तिकडे चोर-चिलटांनी केव्हाही ये-जा करण्यासाठी चितदरवाजाच्या पोलादी दारांना मात्र पाय फुटू लागले आहेत' पिता-पुत्रामधील हा संवाद वाचताना अक्षरश: काळजाला घरं पडतात. तर कादंबरीत ठायी-ठायी आढळणाऱ्या विविध प्रसंगातील इरसाल संवादांनी वाचक केव्हा जेरबंद होऊन जातो, ते कळतही नाही.

इतिहासाचा अपलाप करून लेखण्या झिजणाऱ्या पोटार्थी तट्टूंच्या शब्दांचा चिखल गेली तीन शतकं महाराष्ट्रानं वागविला. मात्र बदनामीच्या कोळीष्टकामध्ये झाकोळून गेलेला संभाजी राजांसारखा अनमोल हिरा आता विश्वास पाटील यांच्या लेखणीने चमकू लागला आहे. सह्याद्रीच्या कडेकपारीत उंदरांची बिळं आढळतात. बिळाच्या तोंडातून आत शिरलं की त्याचा माग सापडत नाही. कारण उंदरानं जमिनीखाली आडवी-तिडवी बिळांची जंत्रीच करून ठेवलेली असते. ही बिळं एकमेकात इतकी बेमालूमपणे गुंफलेली असतात की ती भल्या-भल्यांना चकवा देतात. दमछाक करतात. 'संभाजी' कादंबरीचही तसंच आहे. पहिल्या शब्दापासून कादंबरीत एकदा प्रवश केला की, इतक्या वाटा, आडवाटा, वळणं लागतात की आपण कुठून कुठे चाललो आहोत, हेच कळत नाही. क्षणभर एखाद्या वळणावर विसावा घ्यावा व पाठीमागे पहावं तर आपणच अचंब्यात पडतो, इतका प्रवास करून आपण आलो यावर क्षणभर आपलाच विश्वास बसत नाही. झालेला प्रवासही इतका बहारदार, चित्तवेधक असतो की पुढील प्रवासाला आपण कधी सुरुवात करतो, हेही कळत नाही.

'संभाजी' महाराष्ट्राच्या पाठीवर सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यात घडलेलं हे ८४० पानांचं महाभारत. कळी-काळाधी टक्कर देणारी जवळपास ७० ते ७५ महत्त्वाची पात्रं, शिलेदार, सखे-सोबती, बाजारबुणगे यांची गणतीच नाही. नीबीड अरण्यं, आकाशाला गवसणी घालणारे किल्ले, आपला ठाव न देणाऱ्या दऱ्या, धावून अंगावर येणारा गोव्यापासून मुंबईपर्यंतचा महासागर आणि या पार्श्वभूमीवर मराठी सल्तनीसाठी खस्ता खाणाऱ्या राजा महाराजांचा डौल तर दुसरीकडे मराठी कद्रूवृत्ती. राग, लोभ, गद्दारी, विश्वासघात आदी माणसाच्या मनात आसनस्थ असलेल्या भाव-भावनांचा खातेरा. एका विशाल पटाचा डोलारा खांद्यावर घेऊन उभी राहिलेली व मंत्रमुग्ध करून सोडणारी ही महाकाय कादंबरी. 'बिलामत'पासून 'भीमेकाठी भिजली गाथा!' या बावीस अध्यायात आपली मुळं खोलवर रुतवून राजहंसासारखा आपला डौल दाखवणारी. कोणतं प्रकरण डावं ठरवायचं व कोणतं उजवं याबाबत वाचकांनाच भ्रमिष्ट करणारी.

कादंबरीची सुरुवात होते ती त्र्यंबकरावाच्या खलबताने. मोघली सत्तेशी हातमिळवणी करून त्यांना छ. शिवाजी महाराजांचाच काटा काढायचा असतो, परंतु ज्या गोदामुळे छ. संभाजींना बदनाम करण्यात आलं, तीच गोदा हा कट

## नवी संहिता... नवा आशय...

# भारतीय संस्कृतीचे सर्जक

**दिनकर जोषी**
**योगेश पटेल**

अनुवाद

**अनघा प्रभुदेसाई**




संस्कृती सर्जकांची आणि भारतीय संस्कृतीची महत्ता व गुणवत्ता अधोरेखित करणारं विचारधन.

**किंमत : २५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

# चक्र ते चरखा

**दिनकर जोषी**

अनुवाद

**सुषमा शाळिग्राम**




भगवान श्रीकृष्ण आणि महात्मा गांधींचं जीवन - तत्वज्ञान या विषयीचं तौलनिक चिंतन

**किंमत : २७०/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

कसा उधळून लावते व त्यानंतर अण्णाजी दत्तोचा होणारा त्रागा... त्यानंतर कादंबरी उत्तरोत्तर फुलतच जाते. दरबारी कटकारस्थानाला विटलेले संभाजी महाराज माहुलीच्या संगमावर मोघलांना जाऊन मिळतात. खड्या पहाऱ्यात त्यांना बहादूरगडावर ठेवण्यात येते. मोघलांच्या तावडीतून सुटका करून घेण्यात संभाजी महाराज यशस्वी होतात, परंतु राणूबाई ही त्यांची बहीण व गरोदर असलेली पट्टराणी दुर्गाबाई यांना मोघलांच्या पोलादी पकडीतून बाहेर पडता येत नाही. नंतर त्यांचा नगरच्या किल्ल्यातील बंदीवास. त्यांना सोडविण्यासाठी छ. संभाजी महाराजांनी केलेला संघर्ष. मोघलांच्या तावडीतून सुटलेले संभाजी व छ. शिवाजी महाराज यांची भेट. महाराजांच्या मृत्यूनंतर संभाजी राजांना कैद करण्याचा रचण्यात आलेला कट. कटात सामील असणाऱ्यांना संभाजी राजांनी दिलेले जीवदान. तरीही त्यांनी परत दुसऱ्यांदा रचलेला कट. त्यानंतर संभाजी राजांनी त्यांना ठोठावलेली मृत्युदंडाची शिक्षा. जंजिरा किल्ला घेण्यासाठी केलेला आटापिटा. सुरतेवरची स्वारी. गोवा पादाक्रांत करण्यासाठी केलेली चढाई. पोर्तुगीज, मोघल, जंजिऱ्याचा हबशी यांना शह देण्यासाठी वेळोवेळी केलेल्या लढाया. आखलेली, अंमलात आणलेली धोरणे. अशी एकापेक्षा एक सरस घटनांचा मागोवा घेत एखाद्या चित्रपटाच्या पटकथेसारखी कादंबरीची वाटचाल होते.

आपल्या कारकीर्दीत संभाजीराजांनी फक्त लढायाच केल्या नाहीत तर रयतेसाठी सारा माफ, धरण बांधणी अशासारखे उपक्रमही हाती घेतले, पण स्वार्थाने आंधळे झालेले त्यांचे सगे-सोयरेच त्यांचे दुश्मन निघाले व छ. शिवाजी महाराजांनी जिंकलेला एकही किल्ला किंवा मुलुख शत्रूच्या ताब्यात जाऊ न देणारी संभाजीसारखा ढाण्या वाघ मोघलांच्या पंजात अलगद अडकवला! अपणासमोर मांडण्यात आलेला इतिहास म्हणजे संगमेश्वर येथे रंगरगेली करताना मोघलांनी संभाजीराजांना पकडलं, परंतु वास्तव काही वेगळच आहे. औंधच्या अरजोजी व गिरजोजी या यादव बंधूतील भांडण सुटावे यासाठी संगमेश्वर येथे मसलतीचे आयोजन करण्यात आले होते व संभाजी राजेच न्यायनिवाडा करणार होते, परंतु येथेच मोघलांनी विश्वासघाताने छ. संभाजींना कैद केले.

त्या काळातला कोकण प्रांत म्हणजे नीबिड जंगलांनी व्यापलेला प्रदेश. वाट चुकलेल्या स्थानिक रहिवाश्याला जिथ जंगलातला रस्ता सापडायचा

नाही तिथं पर मुलुखातून येणाऱ्या माणसाची काय कथा! परंतु विश्वासघात व स्वार्थ या उत्तीस जागून साक्षात छत्रपती शिवाजी महाराजांचे जावई व संभाजीमहाराजांचे मेव्हणे गणोजी शिर्के यांनी संभाजीराजांना कैद करण्यास मदत केली. गणोजीनं कोल्हापूरजवळच्या पन्हाळगडाच्या पायथ्याशी डेरा टाकून बसलेल्या मुकर्रब खानाची तिथं जाऊन भेट घेतली व मराठी सैनिकांची ठाणी चुकवत त्याला अनुस्कुरा घाटातून संगमेश्वरला आणले व संभाजीराजांना अटक केल्यानंतर खानास कराडपर्यंतची डोंगरवाट दाखविण्यात गणोजीचाच पुढाकार होता. कादंबरीतील या प्रसंगाचे वर्णनं अक्षरशः अंगावर शहारा आणतात.

मोघलांनी संभाजीराजे व कवी कलश यांना कराडहून हलविले व भीमा नदीच्या तिरावर असलेल्या बहाद्दुर गडावर आणले. मोघलांनी तेथे दोघांची धिंड काढली. नंतर या दोघांना घेऊन औरंगजेब तुळापूर-कोरेगावकडे सरकला. तेथे कवी कलशांची जीभ छाटली. डोळे काढले. हात-पाय तोडले. संभाजी राजांचेही असेच हालहाल करून त्यांचाही वध अरण्यात आला. पण त्याकाळी ९६ कुळीची बिरुदावली मिरवणाऱ्या एकाही वतनदार मराठ्याने औरंगजेबास भिडण्याची तयारी दाखवली नाही. तर औरंगजेबाशी आपण किती एकनिष्ठ आहोत, हेच दाखविण्यासाठी ते धडपडत होते. त्याकाळी जिंजीच्या किल्ल्यावर मोठ्या संख्येनं मराठी लढाऊ फौज होती व किल्ल्याचे किल्लेदार म्हणून छत्रपती शिवरायांचे जावई हरजीराजे काम पाहत होते, पण या हरजीराजांनीही संभाजीराजांच्या अटकेनंतर मोघलांवर हल्ला करण्याऐवजी औरंगजेबाला एकनिष्ठतेचा खलिता धाडला, यापेक्षा दारुण शोकांतिका ती कोणती!

पाटलांच्या लेखणीतून कधी झरा कधी ओढा तर कधी नदी बनून आलेला हा इतिहासाचा प्रवाह प्रत्यक्ष वाचल्याशिवाय त्यातली खुमारी लक्षात येणार नाही. भली असो वा बुरी, परंतु छ. संभाजीराजांबद्दल माहिती नसणारी व्यक्ती महाराष्ट्रात तरी विरळीच. लोकांना माहीत असलेलाच विषय अभ्यासाची, संशोधनाची जोड दिली असता किती खुमासदार होतो, हे 'संभाजी'मध्ये दिसून येते.

स्वार्थ आणि गद्दारी हे मराठी मातीस लगलेले शाप आहेत. इथं जशी पराक्रमाची गाथा आहे तशी गांडुळांची जमातही आहे. सतराव्या शतकाच्या उत्तरार्धातील अवघ्या ९-१० वर्षात घडलेली ही गाथा तिथचं संपलेली नाही

तर महाराष्ट्र आजही तेच भोग भोगतो आहे! आजच्या मराठी पार्श्वभूमीवर विश्वास पाटील यांनी या कादंबरीद्वारे कालच्या इतिहासाला जिवंत करून मराठी विश्वाच्या डोळ्यांत झणझणीत अंजन ओतण्याचा प्रयत्न केला आहे, हेच 'संभाजी'चं महायश आहे.

**– राष्ट्रवादी**

## 'विश्वास' पात्र 'संभाजी'

'पानीपत', 'पांगिरा', 'झाडावरती', 'महानायक', 'रणांगण' (नाटक), 'चंद्रमुखी' ह्या एकापेक्षा एक प्रचंड खपाच्या व जाडजूड पुस्तकांच्या लेखकाचे श्री. विश्वास पाटलांचे, 'संभाजी' हे आता आत्ताचे पुस्तक. (कदाचित हे परीक्षण वाचून यायच्या आत त्यांचे आगामी पुस्तक 'माणसं माझी-विठा ते विल्यम शेक्यपिअर' हेही प्रकाशात येऊ शकते. म्हणून हा उल्लेख.)

'संभाजी : वास्तव आणि अवास्तव' हे प्रस्तावना वजा टिपण अतिशय मुद्देसूदपणे (एकूण १७ मुद्दे) शेवटी दिले आहे. त्यात १०७ लेखन संदर्भ असलेल्या ग्रंथापैकी (त्यांची जंगीही दिली आहे व ती इतिहासाच्या अभ्यासकांना अतिशय उपयोगी आहे.) मोजक्या ग्रंथांवर लेखकाची टिपणे दिली आहेत. त्यात रियासतकार सरदेसाई, नरही कुरूंदकर, डॉ. सेन, डॉ. मुद्याचारी, मल्हारराव चिटणीसांची बखर, काही ऐतिहासिक पत्रे वगैरेंची दखल घेतली आहे. प्रस्तुत कादंबरीच्या ढाच्यात असले, तरी ऐतिहासिक बैठक ठेवून त्यात वास्तवाचीच कास धरलेली आहे असा विश्वास लेखक ह्या टिपणातून देतात व कादंबरी प्रकाशित होऊन आता जवळ जवळ एक वर्ष होत आले व ह्या दरम्यान कोणी इतिहासकारकांनी अजून तरी 'पंगा' घेतलेला नाही त्यावरून ह्या कादंबरीला वास्तवाची बैठक निश्चितच आहे ह्याची वाचकांना एव्हाना खात्री झालेली असेल. खरे तर ही कादंबरी असल्याने ह्यात 'अवास्तवा'ची मुभा लेखकाला नक्कीच होती, त्यामुळे 'वास्तवाचा आग्रह' हे वैशिष्ट्य (पुढे चालून इतिहासकारांनी मान्य केल्यावर) ह्यास पात्रांच्या विश्वासार्हतेची एक पुष्टी ह्या दृष्टीने साक्षेपी वचाक तूर्तास पाहू शकतो.

## नवी संहिता... नवा आशय...

# अमृतयात्रा




**दिनकर जोषी**

अनुवाद

**अनघा प्रभुदेसाई**

धृष्टद्युम्नाच्या हातून द्रोणाचार्यांचा अंत होणार होता. तरीही द्रोणाचार्यांनी उत्तम शस्त्रास्त्र विद्या दिली. काय होतं हे गूढ? द्रोणाचार्यांच्या जीवनाचे अज्ञात कोपरे उलगडणारी विलक्षण कादंबरी

**किंमत : २३०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**



# द्वारकेचा सूर्यास्त




**दिनकर जोषी**

अनुवाद

**अनघा प्रभुदेसाई**

यदुवंशाचा विनाश आणि भगवान श्रीकृष्णाचा अंत यांचं हृदयविदारक चित्रण असलेली कादंबरी

**किंमत : १६०/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

'संभाजी हा एक मराठीतील एकमेवाद्वितीयी असा विषय आहे की, या एकाच विषयावर मायमराठीमध्ये सत्तराहून अधिक नाटके लिहिली गेली आहेत.' ह्या लेखकाच्या निरीक्षणावर हबकून जायला होते. लेखकाला तरी ह्याच विषयावर कादंबरी का लिहावीशी वाटली असावी ह्याचे उत्तर आपल्याला कादंबरीच्या शेवटात मिळते. संभाजीराजांची लोकापवादाने मलिन झालेली व्यक्तिरेखा, शक्यतो इतिहासाच्या कसोटीवर व तर्क, कारणमीमांसा, तत्कालीन परिस्थितीच्या समजेवरून, सुधारून त्यांना योग्य तो मानसन्मान मिळवून देण्याची ही अंतस्थ स्फूर्ती आहे आणि तीच लेखकाला कादंबरीच्या शेवट असा करायला लावते.' तशीच काळाच्या डोहात भिजलेल्या आमच्या पराक्रमी शिवपुत्राची ही गाथा वर यायला किती वर्ष लागतील कोणास ठाऊक! पण आज उद्या, परवा, तेरवा, काही शतकांच्या प्रवासानंतर का होईना ती वर येईलच! कारण सत्याएवढी शाश्वत गोष्ट दुनियेमध्ये अन्य नाही! पण जेव्हा न केव्हा, गैरसमजाचे, बदनामीचे तकलादू पडदे फाडून ही खरीखुरी हकीगत समाजमनाला कळेल, तेव्हा मात्र शेजारच्या देहू आणि आळंदीसारख्या इथे वढू गावातही यात्रा भरतील! आपल्या देशासाठी, धर्मासाठी आणि मातीच्या अभिमानासाठी मृत्यूला मिठी मारणाऱ्या ह्या मर्दांच्या समाधीचं दर्शन घेण्यासाठी ह्या शक्तिस्थळाकडे दुनिया धावेल!'

संभाजीराजांचे चारित्र्य दिमाखाने उजळून निघावे ह्या सीमिती कसोटीवर पाह्यले, तर लेखक ह्यात निश्चितच यशस्वी झाला आहे हे वाचकांना पटावे. हे करत असताना लेखकाने तर्कसंगत चारित्र्य उभारणी केली आहे. (अर्थात हे इतिहासाला किती धरून आहे हे इतिहास अभ्यासक वा ब्रिगेडस! पाहून घेतील.) वाचकाला हे पटतेच. खरे तर ही खूप अवघड गोष्ट आहे. जिथे जिथे चरित्रनायक व इतर पात्रांत अंतर्विरोध आहेत तिथे विरोधकाचा जरा खलनायकी रंग गडद केला की झाले, असे सध्याच्या 'चार दिवस...' दर्शकांना वाटणे स्वाभाविक. जसे सुप्रियाने आकांडतांडव केले की अनुराधाचा टी आर पी वाढतो! पण ह्या उघड कसबाला आव्हान मिळते, जेव्हा शिवाजीच्या पार्श्वभूमीवर संभाजीही तेवढाच किंवा काकणभर जास्तच तळपायला हवा असतो. इथे खरे कसब लेखकाला पणाला लावावे लागले असणार. इतिहासाचा संदर्भ असो वा नसो. कादंबरीत शिवाजीच्या व्यक्तिरेखेला कुठेही कमीपणा येऊ देणे धोक्याचे व संभाजीची बाजू जास्त घेतली गेली, तर निष्कारण तोल बिघडणार.

त्यात इतिहासाला धरून राहायचे, तर संभाजीने दिलेरखानाशी संधान बांधणे, एकापेक्षा जास्त बायका असणे, संभाजीची घिंड निघणे, असले अडचणीचे प्रसंग लेखकासाठी अगदी कसोटीचे गेले असणार. कादंबरीच्या एकसंघ परिणामाच्या कसोटीवर पाहिले, तर इथेही लेखक यशस्वीच झालेला आहे. फक्त काही काही घटना व क्षण संभव, असंभवाच्या तर्क विचाराने वाचकांना संभ्रमित करू शकतात व तत्कालीन परिस्थितीच्या संदर्भात चारित्र्याचे गडद रंग फिके करतात.

जसे : संभाजीचे दुश्मनाच्या दिलेरखानला जाऊन मिळणे. गादीवरून कुटुंबात बेबनाव असणे हे तेव्हाच्या काळात सर्रास होते हे वाचकाला ह्याच कादंबरीत बघायला मिळते. जसे औरंगजेबाच्या मुलाने संभाजीला येऊन मिळणे, शिवाजीच्या जावयांनी फितुरी करणे, मराठा सरदारांनी औरंगजेबाला मिळणे, प्रत्येकाचे आपापले स्वत:चे जासूद असणे. म्हणजे ही तत्कालीन ऐतिहासिक वस्तुस्थितीच होती म्हणायची. पण मग संभाजीबद्दल सध्याच्या वाचकाला 'महान' वाटणार नाही. मग शिवाजीने दक्षिणच्या स्वारीवर शंभूराजांना न नेणे, रायगडावर राजारामासाठी कटकारस्थाने होणे व संभाजीचे सळसळते तारुण्य व त्यापायी ही अततायी असे स्पष्टीकरण बरीचशी वातावरण निर्मिती करते. इतकेच काय शंभूराजांना स्वत:ची निर्भत्सनाही करून घ्यावी लागते. ('नाही येसू तो अपराध नव्हता. तो होता तारुण्याचा कैफ, ती होती बेहोशी! पृ. २३८) पुढे शिवाजीराजे हा अपराध पोटात घेऊन त्याला माफ करतात. बरे ही घटना चरित्रनायकाच्या चरित्रात सुरुवातीस घडत असल्याने लेखकाला वाचकांना फारसे तयारही करता येत नाही. त्यामुळे वाचकांच्या मनात थोडा संभ्रम राहतोच.

शंभूराजांवर लोक कसे बालंट आणायचे व त्यामुळे त्यांचे चारित्र्यहनन कसे व्हायचे हे सांगणारा कादंबरीचा पहिलाच प्रसंग असा आहे. गोदू (वाडकरांची सून) शिवाजी महाराजांना दगाफटका आपल्या सासऱ्या व नवऱ्याकडून होणार आहे याची कुणकुण लागताच महाराजांना खबर देण्यासाठी गडावर रात्रीचीच जाते. पण दरवाजे फक्त किल्लेदारच सकाळी उघडतात म्हणून तिला प्रवेश मिळत नाही. मग ती आजूबाजूला, हिरकणी जशी कडाकपारी उतरून गेली होती तसे काही गावते का बघते. 'दोन तीन मनगटाएवढी तिला एक मोरी दिसते. त्यातून ती वर गडावर जाते. महाराजांच्या रखवालदारांना भल्या पहाटे

वर्दी देण्याचा प्रयत्न करते. तोवर शंभूराजेंच्या प्रकार लक्षात आल्यावर ते तिला चौकशीसाठी आपल्या महालात घेऊन जातात. तोवर वाडकर पिता-पुत्र गोदूच्या मागावर येऊन बघतात. तो गोंदूला शंभूराजांनी नेलेली. तर ते महाराजांपुढे तिला शंभूराजांनीच पळवून आणलीय असा बनाव रचतात. चौकशीत आतषबाजीच्या दारूगोळ्याऐवजी खरंच दारूगोळा होता हे बाहेर येते व हा बनाव शंभूराजांच्या बदनामीसाठी होता, असे होते. चारित्र्यावरचा हा कलंक दूर करताना लेखक अनवधानाने गडबड करून बसतो. एक गरीब मुलगी गड सहज चढून जाते. म्हणजे शिवाजीच्या रायगडाच्या सुव्यवस्थेवर संशय येतो. हा संशय लेखकाच्याही मनात आलेला दिसतो. कारण पुढे शंभूराजांच्या तोंडी' पण रायगडाच्या संरक्षत इतकी ढिलाई केव्हापासून पडू लागली? असे येते. बरे वाडकर पितापुत्र पाहात पाहता राजपुत्रावरच आळ आणू पाहतात असे दाखवल्याने शिवाजीच्या दबदब्यावरही संदिग्धता येते. शिवाय लौकिक पातळीवर असे एखाद्या मुलीने गडावर जाऊ शकणे (उतरणे एकवेळ शक्य, पण चढणे अशक्यच असले पाहिजे, शिवाय गोदू काही हिरकणी ही नाहीय.) वाचकांना पटायला अवघडच. बरे मराठी समीक्षेत म.वा. धोंडोनी असल्या लौकिक व शोधक प्रज्ञेने, तर्कावरून पडताळा घेण्याची सोय आधीच करून ठेवलेली आहे. जसे : ज्ञानेश्वरीतल्या 'योगदुर्गाच्या' वर्णनावरून व भौगोलिक साधर्म्यवरून हाच तो देवगिरी/ दौलतबादचा किल्ला असा ते पडताळा देतात किंवा ज्ञानेश्वरातील एका ओवीवरन हिवराच्या झाडाचा शोध घेत थेट दया पवार, लक्ष्मण माने यांच्या पुस्तकातून हिवराचा दाखला देतात. (पहा : ज्ञानेश्वरीतील अलौकिक सृष्टी) किंवा दीपावलीत (२००५ दिवाळी अंक) तुकारामाचे अभंग पाण्यात बुडूनही कसे राखले गेले हे प्रयोग करून त्याची शक्यता वर्तवतात. ह्याच तर्काचा आधार घेऊन वर चढून जाणे अवघडच, ही शंका खुद्द लेखकालाही अस्वस्थ करीत असावी. कारण पुढे तो सांगतो की, हे प्रकरण निवळल्यावर महाराज गडाची पाहणी करून ही त्रुटी तासून काढतात. हा पहिलाच प्रसंग शंभूराजांनी भले 'क्लीन चिट' देता पण ह्या दृश्याने शिवाजीचे चित्रण, सुववस्था, संरक्षण, दबदबा ह्याबाबत समतोल राखण्यात लेखक अयशस्वी होतो.

दिलेखानाला शंभूराजे का मिळतात ह्याची बैठक तयार करताना असे दाखवले की, शंभूराजांना महाराजांच्या सहवासात राहायचे होते. जिजाऊ

## नवी संहिता... नवा आशय...

# एके दिवशी

**डॉ. गिरीश वालावलकर**




उद्योगसमूह, राजकारण, गुन्हेगारी आणि आर्थिक अफरातफर यांचा परस्पर संबंध अलगद उलगडत श्रीधर, चारुलता, यशवंत या व्यक्तिरेखांच्या माध्यमातून मानवी स्वभावाचे पैलू स्पष्ट करणारी कादंबरी

**किंमत : २२०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

# अराजक

**विल्यम डॅलरिंपल**

अनुवाद

**रेश्मा कुलकर्णी-पाठारे**




हजारो मैल दूर असलेल्या कंपनीनं चार खोल्यांच्या कार्यालयातनं दोन लाख सैनिकांच्या बळावर भारतावर वर्चस्व गाजवलं. या वसाहतवादी गळचेपीत भारताची लूट केली. ईस्ट इंडिया कंपनीच्या या जुलमी कारकिर्दीचा सडेतोड विल्यम डॅलरिंपल यांनी घेतलेला धांडोळा.

**किंमत : ७९५/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

माँसाहेबांनी महाराजांच्या नेहमी सावलीत रहात जा. असा लहानपणीच सल्ला दिलेला. पण महाराज दक्षिण मोहिमेवर शंभूराजांना नेत नाहीत. त्याने ते बिथरून जातात व औरंगजेबाच्या संभाव्य लढाईसाठी दिलेखानाला जवळ करतात. आता वाचकांनी 'रायगडाला जेव्हा जाग येते' ह्या नाटकामुळे म्हणा किंवा लोकापवादाने म्हणा असे जाणलेले आहे की, शंभूराजांच्या मनात महाराज आपल्याला एकटे सोडतात, हे शल्य आहे बालपणापासून. शिवाय कुमारवयात 'ॲडोलसन्स' असतोच व त्याचा उद्रेक होतो हा सर्वसाधारण अनुभव. ह्या मानवी भावनेला पुसणारी काही सहवासाची, राजकुमाराला स्वतःच्या तालमीत तयार करण्याची काही गोष्ट कुठे दिले नाही. इतःउप्पर शंभूराजांना महाराजांबद्दल अतीव ओढ होती. असे दाखवले आहे. पण ह्या भावनेची बैठक तयार करण्यात आली नाहीय. त्यामुळे त्यांना पित्याबद्दलच्या असलेल्या ओढीने व्यक्तिमत्त्व चांगले उभे राहते. पण मग ही बंडखोरी का, हे समजायला जड जाते. ही तारुण्यसुलभ बंडखोरी होती हे मानवी स्वभावामुळे पटले असते; पण तसे चांगले नसते दिसले. ह्या तारेवरच्या कसरतीत लेखक लीलया वाचकाला बरोबर घेऊन गेलाय असे मात्र ठामपणे म्हणता येत नाही. मोठाच बाका प्रसंग होता हे मात्र खरे.

नैतिक विधिनिषेधासंबंधी ('प्रोप्रायटी') वाचकाला नेमकी कोणती घ्यावी अशी द्विधावस्था कादंबरीतल्या बऱ्याच वर्णनांतून येते. निरनिराळ्या राजांनी एकमेकांवर चढाया कराव्यात, सुरत, बुऱ्हाणपूर वगैरे शहरे लुटावीत व तिजोऱ्या भराव्यात, कोणी कोणाचाही मुलुख जिंकावा, अधिकाऱ्यांनी वसुली सरकारी तिजोरीत भरू नये, असे असताना शंभूराजेंनी तिडिकेने पोर्तुगीजांना म्हणावे 'जा म्हणावं तिकडे खुशाल. आपल्या पोर्तुगालच्या किनाऱ्यावर बसा तिथे मौजेने डुंबत. इथे घुसखोरी करायचं तुम्हाला कारणच काय?' (पृष्ठ ३५८), 'सत्ताधीशांकडून फायदे उपटण्यासाठी स्वतःच्या पत्नीचा, तरण्या लेकीबाळींचा हात पकडून पाठच्या दरवाजाने भेटणाऱ्या हलकट रांडक्या नामर्दांची संख्या जगात काय कमी असते. (पृ. २९)' असं असताना अण्णाजी दत्तो गोऱ्यांच्या वकिलाकडून दोन रत्नहार लाच म्हणून घेतात व शंभूराजे ते पकडून सरकारी खजिन्यात जमा करतात. इथे लाच घेणे म्हणून इतक्या तीव्रतेने लाजीरवाणे वाटत असेल? व त्यावरची तिडीक? कारण एके ठिकाणी म्हटलंय 'सत्ता जेव्हा लोणच्यासारखी मुरत जाते तेव्हा अधिकाऱ्यांच्याही

